# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**एम.ए.लोकप्रशासन नवीन अभ्यासक्रम सत्र –दुसरे**

**एम.ए.लोकप्रशासन अभ्यासक्रम क्र. -५ ( पाच )**

# भारतातील लोकसेवा

# पुस्तक क्र. तीन

## भारतातील लोकसेवा नियम व कायदे

**संपादक :**

**डॉ. भारत गोरे**

पदवी व पदव्युत्तर लोकप्रशासन विभाग

**विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद**

**लेखकाचे नाव**

**१) प्रा,डॉ.बी.आर. कत्तुरवार**

विभागप्रमुख, पदवी व पदव्युत्तर लोकप्रशासन विभाग
**देगलूर महाविद्यालय, देगलूर जि. नांदेड.**

**२) प्रा,डॉ.सुधाकर श्रीरामे**

**औरंगाबाद**

## अभ्यासक्रम क्र. -५ (पाच )

# भारतातील लोकसेवा

# पुस्तक क्र. तीन

## भारतातील लोकसेवा नियम व कायदे

**घटक १. भारतातील लोकसेवा व प्रशासकीय कायदा : संकल्पना व स्वरूप**

**घटक २. केंद्र व राज्य शासनाचे लोकसेवेसबंधी नियम व कायदे**

**घटक ३. प्रशासकीय न्यायाधीकरण**

**घटक ४. लोकपाल व लोकायुक्त**

घटक ५. माहितीचा अधिकार व सेवा हमी कायदा

घटक ६. लोकसेवेसबंधी विविध आयोग व सुधारणा

## घटक १.

## भारतातील लोकसेवा व प्रशासकीय कायदा : संकल्पना व स्वरूप

अनुक्रमणिका

१.१ उदिष्ट्ये

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

१. ३.१ लोकसेवेचा अर्थ व सकंल्पना

१.३.२. लोक सेवेची (सनदी सेवेची) व्याख्या

१. ३.३ प्रशासकीय कायद्याचा अर्थ व सकंल्पना

**१. ३.४. प्रशासकीय कायद्याची व्याख्या**

**१.३.५ प्रशासकीय कायद्याची पार्श्वभूमी**

**१.४  सारांश**

**१.५ पारिभाषिक शब्द  व शब्दार्थ**

**१.६ स्वंय  अध्यायानासाठीचे प्रश्न**

**१.७ स्वंय अध्ययन  प्रश्नांची उत्तरे**

**१.८ अधिक वाचनासाठी  उपयुक्त पुस्तके**

## १.१ उद्दिष्ट्ये

**लोकसेवा** या घटकाचा  अभ्यास केल्यानंतर आपणाला

* लोकसेवेचा  अर्थ कळेल.
* प्रशासकीय कायद्याचा अर्थ जाणून घेता येईल.
* प्रशासकीय कायद्याची पार्श्वभूमी समजेल.
* लोकसेवेची व प्रशासकीय कायद्याची संकल्पना स्पष्ट होईल.

## १.२ प्रास्ताविक

आधुनिक काळात शासनाने लोककल्याणकारी  राज्याच्या संकल्पनेचास्वीकार केला आहे. त्यामुळे शासनाच्या पर्यायाने लोकसेवकांच्या कार्यात व जबाबदारीत प्रचंड  वाढ  झाली आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात शासन व लोकसेवकामार्फत केली जाणारी कार्ये अत्यंत मर्यादित स्वरुपाची होती. जनतेकडून महसूल गोळा करणे,

कायदा व सुव्यवस्था राखणे व न्यायदान करणे, अशी मर्यादित कामेच त्या काळातील लोकसेवकांना करावी लागत होती.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासनाने लोककल्याणकारी राज्याच्या ( Welfare State) संकल्पनेचा स्वीकार केला आहे . त्यानुसार लोकसेवेच्या स्वरूपात व कार्यात अमुलाग्र बदल करण्यात आला. भारतीय प्रशासन व्यवस्थेतील कोणतेही पद असो त्याचा उल्लेख **'लोक-सेवक'** (सनदी सेवक) म्हणूनच केला जातो, कारण प्रशासनातील प्रत्येक पद हे लोकांच्या कल्याणासाठी बांधील असते.लोकसेवक अथवा सनदी सेवक हां लोकशाहीत्मक शासन व्यवस्थेने ठरविलेल्या धोरणाची व कल्याणकारी योजनांची अमलबजावणी करीत असतात.

जनकल्याणाचा हेतू समोर ठेवून कार्यकारी मंडळ व कायदे मंडळ धोरण निश्चित करत असते तर प्रशासन व्यवस्थेतील लोकसेवक त्या धोरणाची अंमलबजावणी करीत असतात. अनेकदा प्रशासकीय कामे करत असताना लोकसेवक कामचुकारपणा, आळस,भ्रष्टाचार, अनैतिक वर्तन करीत असतात,तर काही विभागात कनिष्ट–वरिष्ठ ,लोकसेवक–जनता यांच्यात अनेकदा संघर्ष निर्माण होत असतो. त्यासाठी लोकसेवकांना योग्य मार्गदर्शन करण्याची व त्यांच्या कार्यावर व वर्तनावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता असते.त्यासाठी वेळोवेळी कायदे, नियम व उपनियम तयार केले जातात.या प्रकरणात आपण लोकसेवेसंदर्भातील विविध कायदे व नियम जाणून घेऊ या.

## १.३ विषय विवेचन

## १. ३.१. लोकसेवेचा अर्थ व सकंल्पना

प्राचीन काळापासून शासनकर्त्यांनी ठरवलेल्या ध्येय धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी नोकर यंत्रणा अस्तित्वात होती. शासन यंत्रणेचा प्रकार कोणताही असो अंमलबजावणी करणारी यंत्रणा म्हणून लोकसेवेला अनन्यसाधारण

महत्व असते. राज्याचे अविभाज्य अंग म्हणून लोकसेवेकडे पहिले जाते. लोकसेवकामार्फतच समाज व राष्ट्राचा सर्वांगीण विकास घडवून आणला जात आहे.

लोकसेवेला सनदी सेवा म्हणून संबोधले जाते. लोकसेवा (civil Service) या शब्दाचा सर्वप्रथम वापर ब्रिटीशकालीन प्रशासनात करण्यात आला. ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरवर्गात दोन प्रकारचे सेवक होते. एक म्हणजे युद्धाच्या कार्याशी संबंधित असलेली सैनिकी सेवा आणि दुसरी म्हणजे व्यापार व प्रशासकीय कार्य पार पडणारी असैनिकी सेवा होय.

असैनिकी सेवेलाच नागरी सेवा किंवा सनदी सेवा ( Civil Service ) या नावानेही संबोधण्यात येत होते. ब्रिटीश काळात निर्माण करण्यात आलेल्या सनदी सेवेलाच स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकसेवा म्हणून संबोधले जाते.सनदी सेवा ही कार्यपालिकेचे अविभाज्य अंग म्हणून कार्य करीत असते. सनदी सेवकांच्या भूमिकेवरच संपूर्ण समाजाचा व राष्ट्राचा सर्वांगीण विकास अवलंबून असतो. या सनदी सेवेत प्रशासनातील वरिष्ठ अधिका–यापासून ते शिपायापर्यत सर्व नोकरवर्गाचा समावेश होतो.

## १.३.२. लोक सेवेची (सनदी सेवेची) व्याख्या :-

शासनाच्या ध्येय–धोरणाची व विविध कायद्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणारा वर्ग म्हणजे लोकसेवक (सनदी सेवक) होय. लोकसेवेच्या (सनदी सेवेच्या) संदर्भात विविध विचारवंतानी व्याख्या केल्या आहेत, त्या खालीलप्रमाणे आहेत.

**१) डीमॉक व डीमॉक** यांच्या मते “कायमची नोकरी असलेला, पूर्णवेळ काम करणारा ,व्यवसायिक दर्जा प्राप्त झालेला व अराजकीय स्वरूप असलेला नोकरवर्ग म्हणजे सनदी सेवक होय. ”

“Civil service is a body of permanent, full time public officials in a professional , non-political status.”

**२) डॉ हरमन फायनर** यांच्या मते, “कायमची नोकरी असलेला, पगारी व कुशल असा व्यवसायिक अधिका–यांचा संघ म्हणजे सनदी सेवा होय.”

“Civil service is the professional body of officials, permanent, paid and skilled.”

**३) अमेरिकन विश्वकोशानुसार** , “सनदी सेवा म्हणजे शासनाच्या अधिकारक्षेत्रात कार्यरत असलेला व वेतनप्राप्त करणा–या कर्मचा–याचा संघटीत विभाग म्हणजे सनदी सेवा होय .”

**४) डॉ एल डी व्हाईट** यांच्या मते ,”लोकसेवा हे प्रशासकीय संघटनेचे एक असे माध्यम आहे की, ज्याद्वारे शासन आपले ध्येय साध्य करू शकते.”

**५) टॉमलिन कमिशनच्या** मतानुसार (१९३१ ), “नागरी स्वरुपाची कार्ये पार पडणारा व ज्यांचे संपूर्ण वेतन संसदेने संमत केलेल्या धनराशीतून दिले जाते ,असा राज्यसंस्थेचा नोकर वर्ग म्हणजे सनदी सेवा होय”.

सारांशरूपाने सागांवयाचे झाल्यास शासनाच्या ध्येयधोरणाची अंमलबजावणी करणारा ,कुशल व कायम स्वरुपाची नोकरी असलेला वर्ग म्हणजे लोकसेवा होय. लोकसेवेच्या भूमिकेवरच समाजाचा पर्यायाने देशाचा सर्वागीण विकास अवलंबून असतो. लोक सेवक प्रामाणिक व कार्यक्षम असतील तरच संपूर्ण प्रशासन व्यवस्था आदर्श बनते.

## १. ३.३ प्रशासकीय कायद्याचा अर्थ व सकंल्पना

लोकप्रशासनशास्त्राच्या अभ्यासामध्ये लोकसेवकांच्या भरती प्रक्रियेपासून ते आर्थिक व सामाजिक लेखापरीक्षणापर्यंत विविध बाबींचा अभ्यास केला जातो. शासनाच्या ध्येय धोरणाची अमलबजावनी करीत असतांना लोकसेवकांचा जनतेशी सर्वाधिक सबंध येत असतो. प्रशासनातील लोकसेवक आणि जनता यांच्यातील सबंध निश्चित करण्याचे कार्य ज्या कायद्यानुसार केले जाते त्यास प्रशासकीय कायदा असे संबोधले जाते.

प्राचीन काळापासून राज्यसंस्थेने घेतलेल्या निर्णयांची अमलबजावणी करण्यासाठी प्रशासन यंत्रणा व लोकसेवक अस्तित्वात होते.साहजिकच प्राचीन काळापासून ते आजदेखील लोकसेवकांचा जनतेशी सबंध कायम आहे. लोकसेवक व जनता यांच्यातील सबंध निश्चित करण्यासाठी जे कायदे नियम तयार केले जातात त्यास प्रशासकीय भाषेत प्रशासकीय कायदा असे म्हणतात.

लोकप्रशासनशास्त्रात प्रशासकीय कायद्याच्या अभ्यासाला विशेष महत्व दिले जाते. प्रशासकीय कायद्यामुळे लोकसेवकांना संरक्षण मिळत असते. प्रशासकीय कायद्यामुळे लोकसेवकांना संरक्षण मिळते आणि नागरिकांच्या हक्कांची पायमल्ली होते, असे प्रशासकीय कायद्या संदर्भात नकारात्मक दृष्टीने म्हटले जाते. लोकप्रशासनातील लोकसेवकांच्या सबंधित असलेली कायद्याची व्यवस्था किंवा प्रणाली म्हणजेच प्रशासकीय कायदा होय.

## १. ३.४. प्रशासकीय कायद्याची व्याख्या

प्रशासकीय कायद्याची अनेक विचारवंतांनी व्याख्या केल्या असून त्या खालीलप्रमाणे आहेत.

**१) डब्लू.बी.मन्रो** यांच्यामते,"प्रशासकीय कायदा म्हणजे न्यायविषयक तत्वांची अशी व्यवस्था की,जी एका बाजूला शासकीय अधिका-याना, त्यांनी प्रशासकीय अधिकारातून केलेल्या कृतीबद्दल सामान्य न्यायालयाच्या जबाबदारीतून मुक्त करते;परंतु त्याचवेळी

त्यांना त्या कृतीबद्दल जबाबदार धरण्यासाठी दुस–या प्रकारची विशेष कार्यपद्धती प्रस्थापित करते."

**२) के.सी.डेव्हीस** यांच्यामते,"प्रशासकीय सत्तेचे अधिकार व कार्यपद्धती तसेच प्रशासकीय कार्याचे न्यायालयीन परीक्षण यांच्याशी सबंधित असलेला कायदा म्हणजे प्रशासकीय कायदा होय."

३) **आयव्हर जेनिग्ज** यांच्यामते,"प्रशासकीय कायदा प्रशासनाशी सबंधित असतो.तो प्रशासकीय सत्तेचे संघटन,अधिकार व कर्तव्य निश्चित करतो आणि नागरिकांच्या हक्काचे उलंघन होत असेल तर त्याविषयी करावयाचे उपायही सुचवितो."

सारांश रूपाने सांगावयाचे ते प्रशासकीय कायदा हा लोकसेवक व नागरिक यांच्यातील सबंध निश्चित करीत असतात.लोकसेवक हे शासनाचे प्रतिनिधी म्हणून काम करीत असताना त्यांचा नागरिकांशी सबंध येत असतो. त्याबाबतीत त्यांचे हक्क व जबाबदारी निश्चित करण्याचे कार्य प्रशासकीय कायदा करीत असतो.

सारांश रूपाने सांगावयाचे तर प्रशासकीय कायदा हा लोकसेवक व सामान्य नागरिक यांच्यातील सबंध निश्चित करतो. प्रशासकीय अधिका–यांचे स्थान, अधिकार, कर्तव्य, हक्क आणि विशेषाधिकार निश्चित करण्याचे कार्ये प्रशासकीय कायद्याद्वारे केले जाते.

## १. ३.५. प्रशासकीय कायद्याची पार्श्वभूमी :-

जगाच्या इतिहासात इ.स.१७८९ मध्ये झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीमुळे स्वातंत्र्य,समता,न्याय व बंधुता ही आदर्श लोकशाहीत्मक मानवी मूल्य या क्रांतीमधून निर्माण झाली. या क्रांतीनंतर फ्रान्समधील प्रशासकीय कामकाजात न्याय संस्थेचा होणारा हस्तक्षेप कमी व्हावा, हा विचार समोर आला व त्यासाठी लोकसेवकांच्या हक्कांच्या सुरक्षिततेसाठी अनेक कायदे तयार करण्यात आले परंतु तत्कालीन लोकसेवक मिळालेल्या अधिकाराचा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग करू लागले.

. फ्रान्समधील लोकसेवक त्याच्या सुरक्षिततेसाठी तयार केलेल्या कायद्याचा गैरवापर करू लागले.त्याचा प्रतिकूल परिणाम

नागरिकांचे स्वातंत्र्य व हक्क यांचा संकोच मोठ्याप्रमाणात होऊ लागला. तेंव्हा लोकसेवक व नागरिक यांच्यातील सबंध निश्चित करण्यासाठी अनेक प्रशासकीय कायदे तयार करण्यात येऊ लागले. फ्रान्समध्ये नेपोलियन बोनापार्ट या जगप्रसिद्ध सम्राटाने या संदर्भात असा कायदा तयार केला होता की, लोकासेवकांच्या कामात न्याय संस्थेने हस्तक्षेप करू नये आणि प्रशासनातील अधिका–याना सामान्य नागरिकापेक्षा काही विशेष अधिकार असावेत, असे लोकसेवकांना कायद्याचे संरक्षण त्यांनी दिले होते.

प्रशासकीय कायद्यामुळे लोकसेवकांना विशेष अधिकार व संरक्षण मिळत असल्यामुळे प्रसिद्ध प्रशासकीय विचारवंत प्रो.डायसी यानीप्रशासकीय कायद्यासंदर्भात प्रचंड टीका केली आहे. ते असे म्हणतात की, लोकसेवकानी आपल्या कर्तव्यात चुका किंवा कसूर केलातरी प्रशासकीय कायद्यामुळे त्यांना संरक्षण मिळते शिवाय ज्या वादामध्ये अथवा खटल्यामध्ये एक पक्ष सरकार अथवा लोकसेवक आहे असे खटले सामान्य न्यायालयात न चालविता प्रशासकीय न्यायाधीकरणात चालविली जातात.

## १. ३.६. प्रशासकीय कायद्याच्या वाढीची करणे :-

लोकसेवक व नागरिक यांच्यातील सबंध निश्चित करण्यासाठी अनेक प्रशासकीय कायदे तयार करण्यात आले आहेत. अलीकडच्या काळात भारतासह विविध राष्ट्रात प्रशासकीय कायद्यांच्या संखेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून त्याची करणे आपण जाणून घेऊ या.

### १. ३.६. १ लोककल्याणकारी राज्याचा स्वीकार :-

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतासह बहूतांश राष्ट्रांनी लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा स्वीकार केला आहे.त्यामुळे तळगळातील लोकांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे, लोकांचा आर्थिक व सामाजिक जीवनस्तर उंचावला पाहिजे, हा विचार पुढे आला आणि व्यक्तिगत हितापेक्ष सामाजिक हिताला

महत्व देणारे प्रशासकीय कायदे वाढीस अनुकूल वातावरण तयार झाले व त्यातून प्रशासकीय कायद्यामध्ये मोठी वाढ झालीआहे.

## १. ३.६.२ लोकसेवकाना विवेकशीलतेने काम करता यावे म्हणून :-

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आधुनिक शासनाने अनेक सार्वजनीक उद्योगांची उभारणी केली आहे. त्यामुळे व्यावसायिक व आर्थिक क्षेत्रात काम करताना अनेकदा परिस्थितीचा योग्य विचार करून निर्णय घ्यावा लागतो. लोकसेवकांना कार्ये करण्यासाठी पुरेसे स्वातंत्र्य असावे लागते.तसेच अनेक विकासात्मक योजनांची अमलबजावणी करताना देखील जनहितासाठी स्वविवेकाला प्रमाण मानून निर्णय घ्यावा लागतो. लोकसेवकांची कार्यक्षमता विकसित करण्यासाठी व त्यांना विवेकशील काम करता यावे म्हणून प्रशासकीय कायदे आवश्यक आहेत.

## १.३.६.३. त्वरीत न्याय प्राप्तीसाठी :-

सर्वसामान्य नागरिकांची अशी अपेक्षा असते की,अन्यायाच्या विरोधात न्यायालयात दाद मागितल्यानंतर लवकरात लवकर न्याय मिळावा. सामान्य न्यायालयात अपील केल्यानंतर निकालासाठी अनेक वर्ष वाट पहावी लागते याउलट प्रशासकीय न्यायालयात दाद मागितल्यास त्वरित न्याय मिळतो. प्रशासकीय न्यायालयातील न्याय कमी खर्चात ,कमी वेळेत व कमी श्रमात प्राप्त करता येतो,त्यासाठी प्रशाकीय कायदा व प्रशासकीय न्यायाधिकरण यांचा मोठ्याप्रमाणात विकास झाला आहे.

## १.३.६.४. लोकसेवकांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी :-

प्रशासकीय कायद्यामुळे लोकसेवक आपले कार्ये अधिक कार्यक्षमतेने व निर्भीडपणे करू शकतात. त्यांना काम करताना पुरेसे स्वातंत्र्य मिळावे व त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ व्हावी म्हणून प्रशासकीय कायद्यांचा विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे.

## १.४ सारांश

आधुनिक काळात शासन व प्रशासनाच्या कार्यात प्रचंड वाढ झाली, ही बाब प्रशासकीय कायद्याच्या वाढीसाठी महत्वपूर्ण ठरली आहे.विशेष म्हणजे समाज व राष्ट्राच्या विकासासाठी कायद्याच्या अमलबजावणीचे काम करताना ताठर भूमिका घेवून चालत नाही तर त्यात गरजेनुसार परिस्थितीनुसार बदल करावा लागतो. त्यासाठी लोकसेवकांना पुरेसे स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यासाठी प्रशासकीय कायद्यांची आवश्यकता आहे.

मागील काही वर्षापासून भारतातील प्रशासन यंत्रणा अनेक दोषांनी खिळखिळी बनली आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी म्हणजेच नोकरशाहीमुक्त प्रशासन बनवण्यासाठी प्रशासकीय कार्यालयात स्वयंचलित साधन सामुग्रीचा वापर मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे. प्रशासकीय कायदे हे लोकसेवकांना अधिक समर्पित भावनेने काम करण्यासाठी निर्भीडपणे काम करण्यासाठी तयार करण्यात आले आहेत याची जाणीव ठेवून लोकासेवकानी कार्ये केली पाहिजेत. तसेच ई–प्रशासनाकडे म्हणजेच इलेक्ट्रॉनिक साधन सामुग्रीच्या मदतीने प्रशासन चालवण्याकडे भर देणे आवश्यक आहे. तसेच अधिकारी वर्गामध्ये नीतीमूल्याविषयी आस्था व कार्य संस्कृती विकसित करणे आवश्यक आहे.

## १.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**लोककल्याणकारी राज्य :-** लोकांच्या कल्याणासाठी म्हणजेच जनहिताला प्राधान्य देवून कामे करणारी राज्यव्यवस्था म्हणजे लोककल्याणकारी राज्य होय.

**प्रशासकीय कायदा :-** प्रशासकीय सेवेचे संघटन,अधिकार व कर्तव्य निश्चित करणारा व नागरिकांच्या हक्काचे उलंघन होत असेल तर त्याविषयी प्रतिबंध घालणारा कायदा म्हणजे प्रशासकीय कायदा होय.

**लोकसेवा**:– शासनाच्या धोरणाची अमलबजावणी करणारी अधिकारी व कर्मचारी यंत्रणा म्हणजे लोकसेवा होय.”

## १.६स्वंय अध्ययन प्रश्न :-

**१) आधुनिक शासनाने ..........राज्याचा स्वीकार केला आहे.**

अ) हुकुमशाही राज्य ब) लोककल्याणकारी राज्य
क) साम्यवादी राज्य ड) यापैकी नाही

**२) त्वरित न्याय प्राप्तीसाठी ........मध्ये दाद मागावी लागते.**

अ) सामान्य न्यायालय ब) प्रसार माध्यम क) प्रशासकीय न्यायाधिकरण ड) यापैकी नाही

**३) ............क्रांतीमुळे स्वातंत्र्य,समता,न्याय व बंधुता ही आदर्श लोकशाहीत्मक मानवी मूल्य विकसित झाले आहेत.**

अ) अमेरिकन ब) रशियन क) फ्रेंच ड) यापैकी नाही

**४) लोककल्याणकारी राज्याच्या स्वीकारामुळे .................च्या कार्यात वाढ झाली.**

अ) लोकसेवकांच्या ब) उद्योगपतीच्या
क) समाजसेवकांच्या ड) यापैकी नाही

**५) ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात सनदी नोकर वर्गात ........ प्रकारचे सेवक होते.**

अ) तीन ब) दोन
क) चार ड) यापैकी नाही

## १.७ स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

**१) ब २ ) क ३ ) क ४ ) अ ५ ) ब**

## १.८ अधिक वाचनासाठी उपयुक्त पुस्तके

१. फाडिया बी.एल. " लोकप्रशासन", साहित्य भवन पब्लिकेशन, नई दिल्ली.

२. फडिया एवं फडिया "उच्चतर लोकप्रशासन" साहित्यभवन प्रकाशन, आग्रा–२००१.

३. दुबे अशोककुमार, “२१ वी शताब्दी मे लोकप्रशासन”, टाटा मॅकग्रा हिल पब्लिशिंग कंपनी, नवी दिल्ली. २०११
४) सोनवणे जगताप :- अधिकारी मार्गदर्शक, सोनादिपा पब्लिशर्स धुळे ,सप्टेंबर २००४

५) सोनवणे जगताप :- कर्मचारी मार्गदर्शक,सोनादिपा पब्लिशर्स धुळे ,सप्टेंबर २००७

# घटक २.

# केंद्र व राज्य शासनाचे लोकसेवेसबंधी नियम व कायदे

**अनुक्रमणिका**

**२.१ उदिष्ट्ये**

**२.२ प्रास्ताविक**

**२.३ विषय विवेचन**

**२. ३.१ लोकसेवेसबंधी नियम व कायद्याची आवश्यकता**

**२. ३.२ केंद्र शासनाचे लोकसेवेसबंधी नियम व कायदे**

**२.३.३.महाराष्ट्र शासनाचे लोकसेवेसबंधी नियम व कायदे**

**२.४ सारांश**

**२.५ पारिभाषिक शब्द  व शब्दार्थ**

**२.६ स्वंय  अध्यायानासाठीचे प्रश्न**

**२.७ स्वंय अध्ययन  प्रश्नांची उत्तरे**

**२.८ अधिक वाचनासाठी  उपयुक्त पुस्तके**

## २.१ उद्दिष्ट्ये

**'केंद्र व राज्य शासनाचे लोकसेवेसबंधी नियम व कायदे'** या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणाला

* लोकसेवकांच्या आचरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी केलेल्या  नियम व कायद्याची आवश्यकता  समजेल..

* लोकसेवेसबंधी केंद्र शासनाने केलेले विविध नियम व कायदे यांची माहिती मिळेल.

* महाराष्ट्र  शासनाचे लोकसेवेसबंधी केलेले नियम व कायदे समजून घेता येईल.

* लोकसेवकांच्या आचरणासंदर्भात न्यायालयाचे विविध निर्णय जाणून घेता येईल.

## २.२ प्रास्ताविक

आधुनिक काळात समाजाचा पर्यायाने देशाचा विकास घडविण्यात सर्वाधिक महत्वपूर्ण भूमिका प्रशासन व्यवस्थेची आहे. प्रशासन व्यवस्थेची कार्यक्षमता व गुणवत्ता ही लोकसेवकांच्या क्षमतेवर अवलबून असते.त्यामुळेच लोकसेवक किंवा सनदी सेवक हा प्रशासन व्यवस्थेचा आत्मा मानला जातो.लोकसेवकांना केंद्र व राज्य शासनाचे विश्वासू प्रतिनिधी म्हणून जनतेमध्ये जावून प्रत्यक्ष अंमलबजावणीत्मक कामे करावी लागतात. त्यासाठी लोकसेवकांना आवश्यक असलेले अधिकार प्रदान करणे आवश्यक व अनिवार्य असते.

कित्येकदा ज्या लोककल्याणाच्या उद्देशासाठी लोकसेवकांना अधिकार दिले आहेत, त्यांचा दुरुपयोग करून स्वार्थ साधला जाण्याची शक्यता असते. लोकसेवकांना मिळालेल्या अधिकाराचा गैरवापर होऊ नये म्हणून त्यांच्यावर अंकुश ठेवणे आवश्यक आहे.लोकसेवकांच्या वर्तनावर तथा आचरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी आचारसंहिता असावी लागते. त्यासाठी भारतीय संसद व शासनकर्ते काळानुरूप कायदे,नियम ,उपनियम तयार करीत असतात,कायद्याने घालून दिलेल्या चौकटीत राहूनच लोकसेवकांना विविध प्रशासकीय कामे करावी लागतात.

## २.३ विषय विवेचन

लोकसेवकांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियम अथवा नियमावली असणे काळाची गरज बनली आहे.आंतरराष्ट्रीय पातळीवर विचार केल्यास अमेरीकेतील प्रशासन व्यवस्थेत इ.स. १९५६ मध्ये थामस जी.स्टेपस या लेखकाने अमेरिकन लोकसेवकासंदर्भात एक नीती नियमावली तयार केली त्यास Code of Ethics for personnel Administration यानावाने संबोधले जाते. या नीतीनियमावलीत खालील बाबी नमूद केल्या होत्या.

* लोकसेवकांनी वैयक्तिक हीत न पाहता संघटनेसाठी समर्पित भावनेने काम केले पाहिजे.

*शासन आणि लोकसेवक यांनी परस्परांचा विश्वास संपादन केले पाहिजे.
*लोकसेवकांच्या ज्ञानात वाढ करण्यासाठी नवनवीन माहिती व ज्ञान उपलब्ध करून दिले पाहिजे.
*लोकसेवकांच्या योग्यतेनुसार त्यांच्याकडून कामे करून घेतली पाहिजेत.
*कार्यप्रवणता व नैपुण्य विकसित करण्यासाठी विशेष कार्यक्रम हाती घ्यावेत.
* सर्वसमावेशक व न्याय स्वरूपाच्या व गुणवत्तेवर आधारित कार्यक्रमास प्रोत्साहन देवून जनतेचे हित जोपासावे.
* सार्वजनिक हिताच्या दृष्टीने लोकसेवकांमध्ये एकात्मतेची भावना विकसित करावी.

## २. ३.१ लोकसेवेसबंधी नियम व कायद्याची आवश्यकता

लोकसेवक शासकीय कार्यालयात नोकरी करीत असतात. नोकरी करणे म्हणजे नेमके काय करणे होय ? नोकरी करणे म्हणजे सेवा करणे असा अर्थ अपेक्षित आहे . सेवा ह्या शब्दाचे अनेक अर्थ निघतात पण इथे आपण हा शब्द प्रशासकीय कार्यालयातील सेवा (Service) या अर्थाने घेत आहोत. सेवा या शब्दाचा अर्थ Service for Remuneration असा अर्थ अपेक्षित आहे. नोकरीत विशिष्ट कामे करावी लागतात. ते काम करण्यासाठी लोकसेवकाकडे विशिष्ट ज्ञान आवश्यक असते,जर ते नसेल तर विविध मार्गाने ज्ञान व कौशल्य विकसित करावे लागते.

लोकसेवा किंवा नोकरी हा देखील एक व्यवसाय मानला जातो, व्यवसायात जी मुल्ये, नितीनियमावली जपली जाते त्याचप्रमाणे प्रशासनातील लोकसेवकांना देखील आचार संहितेचे पालन करावे लागते. व्यवसायात ज्याप्रमाणे परस्पर विश्वास , ग्राहकाप्रती आदराची भावना, काटकसर, कार्यक्षमता, सौजन्य इत्यादी बाबी लोकसेवकांमध्ये असावे लागतात. त्यासाठी

केंद्र व राज्य शासन लोकसेवकाच्या वर्तनावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी कायदे नियम संमत करीत असते.
अधिकारी वर्गावर योग्य स्वरूपाचा अंकुश नसेल तर त्याचा प्रतिकूल परिणाम विकासकामावर पडत असतो.त्यामुळे त्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार कायदे नियम तयार करीत असते व त्याद्वारे लोकसेवकांवर नियंत्रण ठेवले जाते.केंद्र शासनाने लोकसेवकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तयार केलेले अधिनियम आपण जाणून घेवू या.

## २. ३.२ केंद्र शासनाचे लोकसेवेसबंधी नियम व कायदे

## १) अखिल भारतीय सेवा वर्तणूक अधिनियम १९६४

लोकप्रशासन व्यवस्थेतील लोकसेवकाचे वर्तन सदाचाराला धरून असले पाहिजे. तसेच त्यांच्या वर्तनावर योग्य स्वरुपात नियंत्रण असावे म्हणून केन्द्र शासन अनेक कायदे,नियम निश्चित करीत असते. स्वातंत्र्योतत्रर काळात लोकसेवेत भ्रष्टाचाराची समस्या निर्माण झाली होती.प्रशासकीय कार्य पध्तीत देखील अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. देशातील प्रशासन व्यवस्थेत कशी सुधारणा करता येईल? व लोकसेवेतील भ्रष्टाचार कमी कसा करता येईल? याचा अभ्यास करण्यासाठी इ.स. १९६२ मध्ये **के.संन्थानम** यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने आपला अभ्यासपूर्ण अहवाल केंद्र शासनाकडे सादर केला. त्यातील लोकसेवेत सुधारणा करण्यासाठी,व त्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी काही महत्वपूर्ण शिफारशी सादर करण्यात आले. त्यानुसार केंद्र शासनाने इ.स. १९६४ मध्ये लोकसेवकांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र अधिनियम संमत केला .

**केंद्रीय सनदी सेवा आचरण नियमावली -१९६४**

केंद्रीय प्रशासन व्यवस्थेतील लोकसेवकंच्या आचरणावर नियन्त्र ठेवण्यासाठी तयार केलेली हि नियमावली ही भारताच्या गृह मंत्रालयाने दि.३०/११/१९६४ रोजी लागू केली आहे. या नियमावलीनुसार भारतातील सर्व लोकसेवकांना आपले कर्तव्य पार पाडावे लागते. या नियमावलीतील काही महत्वपूर्ण तरतुदी खालील प्रमाणे आहेत.

१) पर्यवेक्षनात्त्मक स्वरूपाची कामे करणा–या सनदी सेवकांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेले सर्व कर्मचारी सत्यनिष्ठ व कर्तव्य परायण राहून काम करतील, यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.
२) कोणताही सरकारी कर्मचारी आपल्या कर्तव्याचे पालन करण्यासाठी मिळालेल्या अधिकाराचा उपयोग त्याच्या सद्सदविवेकबुद्धीने करेल. तसेच वरिष्ठांच्या निर्देशानुसार विविध प्रशासकीय कार्ये करीत राहील.
३) वरिष्ठांनी दिलेले निर्देश शक्यतो लिखित स्वरुपात असावेत.जेथपर्यंत शक्य आहे तेथपर्यंत आदेश लिखित स्वरूपात असावेत.ज्याठिकाणी तोंडी आदेश देणे अनिवार्य आहे तेथे तोंडी आदेश दिल्यानंतर त्यासंदर्भात लगेच लिखित स्वरुपात आदेश निर्गमित करेल.
४) कोणताही सरकारी कर्मचारी त्यास अशोभनीय ठरेल असे वर्तन करणार नाही.
५) जर एखाद्या कर्मचा–याने निर्धारित वेळेच्या आत आपले कार्य योग्य गुणवत्तेसह पूर्ण करणार नाही त्यास कर्तव्यात कसूर केल्याचे समजून शिस्तभंगाची कारवाही करण्यात येईल.
६) कोणताही कर्मचारी जनतेच्या कामात विलंब होईल अशी कल्पना अमलात आणणार नाही.
६) प्रत्येक सरकारी कर्मचारी विवाहासाठी किमान वयोमर्यादा ,पर्यावरण संरक्षण,वन्यप्राण्यांची सुरक्षितता आणि संस्कृतीविषयक शासनाच्या धोरण व कायद्यांचे पालन करेल.
७) प्रत्येक सरकारी कर्मचारी महिला सुरक्षितता संदर्भात शासनाच्या धोरण व कायद्यांचे पालन करेल.

८) शासकीय कामकाजाच्या ठिकाणी कोणताही सनदी सेवक महिलांच्या शारीरिक शोषणासंदर्भात कसल्याही स्वरुपाची कृती करणार नाही .कार्यालयातील मुख्य प्रशासकाने आपल्या कार्यालयात कोणत्याही स्वरूपात महिलांचे शारीरिक शोषण होणार नाही यासाठी प्रयत्न करेल.

९) महिलांना छेडछाड करणे,यौनसंबध ठेवण्याचा आग्रह धरणे,अश्लील बोलणे,अश्लील फोटो दाखवीणे याशिवाय अन्य मार्गाने शारीरिक,तोंडी अथवा अन्य हावभाव करून अश्लील वर्तन करू नये.

लोकसेवकांच्या आचरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी वरील महत्वपूर्ण तरतुदी करण्यात आले. केंद्रीय सनदी सेवा आचरण नियमावली १९६४ नुसार आचरण करण्याची बंधने सर्व सनदी सेवकांवर लावण्यात आली आहेत.लोकासेवकांचे आचरण कायदा व नियमांच्या चौकटीत असावे यासाठी देश पातळीवर सुप्रीम कोर्टाने अनेक महत्वपूर्ण निर्णय दिले आहेत ते खालील प्रमाणे.

***वरिष्ठांवर शारीरिक हल्ला करणे वा अश्लील भाषा वापरून शिवीगाळ करणे ही गंभीर गैरवर्तणूक आहे.**

सर्वोच्च न्यायालयाने मार्च २००५ मध्ये मा.न्यायमूर्ती संतोष हेगडे ,न्या. तरूण चटर्जी आणि न्या. बालसुभ्रम्ह्ण्यम यांनी एका निकालात असा निर्णय दिला की,वरिष्ठांवर शारीरिक हल्ला करणे वा अश्लील भाषा वापरून शिवीगाळ करणे ही गंभीर गैरवर्तणूक आहे. अशा कर्मचा–यास बडतर्फ देखील केले जाऊ शकते.

*** नैतिक अध:पतनाच्या गुन्ह्याची माहिती लपविणे ही गैरवर्तणूक होय.** इ.स. २००३ मध्ये मा.सुप्रीम कोर्टाने रामरतन यादव विरुद्ध राज्य सरकार या खटल्याचा निकाल देताना असे म्हटले आहे की, लोकसेवकास भारतात अथवा परदेशात कोणत्याही गुन्ह्यासाठी अटक झाली असेल तर त्यासबंधी माहिती कार्यालयास त्वरित कळविणे आवश्यक आहे.

*** कर्तव्यात दुर्लक्ष्य करणा-या लोकसेवकावर कार्यवाही करावी.**

इ.स. १९७९ मध्ये सुप्रीम कोर्टाने भारत संघराज्य विरुद्ध जे.अहेमद या केसमध्ये असा निर्णय दिला की,आपले कर्तव्य योग्यप्रकारे व निष्ठेने पार न पडणारा कर्मचारी गैरवर्तणूक करीत असतो.कर्तव्यात अक्षम्य व सतत दुर्लक्ष्य करण्याची कृती ही अपराध ठरणार नाही पण गैरवर्तणूक ठरते.त्यामुळे सबंधित लोकसेवकावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

## २.३.३ महाराष्ट्र शासनाचे लोकसेवेसबंधी नियम व कायदे :-

सर्वसामान्य नागरिक असो अथवा लोकसेवक असो त्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक असते, किंबहुना ती बाब समाज व राष्ट्रहितासाठी अनिवार्य असते . लोकसेवक तर केंद्र व राज्य शासनाचे विश्वासू प्रतिनिधी म्हणून प्रत्यक्षात अमलबजावणीत्मक कार्ये करीत असतात.विशेष म्हणजे लोकसेवकाला जे पद प्राप्त होत असते त्या पदाला विशिष्ट प्रतिष्ठा असते. त्यांच्याकडे असलेल्या विशेष अधिकारामुळे समाजात व प्रशासन व्यवस्थेत प्रतिष्ठा मिळत असते.

लोकसेवकांना मिळालेले अधिकार,सेवेची सुरक्षितता, निवास व्यवस्था, वाहन व्यवस्था, सेवेला नोकर–चाकर असतात. शासनाच्या विविध योजनांची अमलबजावणी करण्यात त्यांची महत्वपूर्ण भूमिका असते. त्यामुळे आजच्या काळात लोकसेवक या पदाचे विशेष आकर्षण आहे. लोकसेवकांना मिळालेल्या अधिकारावर योग्य स्वरूपाचा अंकुश नसेल तर त्याचा प्रतिकूल परिणाम विकासकामावर पडत असतो.त्यामुळे त्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार कायदे, नियम तयार करीत असते व त्याद्वारे लोकसेवकावर नियंत्रण ठेवले जाते.आपण त्याअनुशंगाने महाराष्ट्र शासनाने तयार केलेले काही निवडक कायदे जाणून घेऊ या.

## १) महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक अधिनियम१९७९

लोकप्रशासनातील लोकसेवकानी शासनाने आखलेल्या ध्येय धोरणाची समर्पित भावनेने अमलबजावणी केली पाहिजे. नेहमी सचोटीने वागले पाहिजे,कर्तव्यपरायण असले पाहिजे यासाठी महाराष्ट्र राज्याने दि.१२ जुले १९७९ रोजी महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक अधिनियम–१९७९ अंमलात आणला आहे. त्यात खालील तरतुदींचा समावेश आहे.

अ) लोकसेवकाने नेहमी सचोटीने वागले पाहिजे.(Absolute Integrity)म्हणजेच पैशाची अफरातफर ,दप्तरात खाडाखोडी करणे अथवा भ्रष्टाचार करणे इत्यादी वर्तन सचोटीचे नाही.

ब) लोकसेवकाने अशोभनीय ठरेल असे कोणतेही वर्तन करू नये.

क) लोकसेवकाने नेहमी कर्तव्य परायण असले पाहिजे.म्हणजेच कार्यालयीन वेळेत आपली जबाबदारी अथवा कामे व्यवस्थित करणे होय. प्रशासकीय कार्यालयातील जर एखादा कर्मचारी कामावर उशिरा येणे, आदेशाचे पालन न करणे, कार्यालयीन वेळेचा दुरुपयोग करणे, कार्यालयीन वेळेत झोपणे, काम करण्यास नकार देणे, अनाधीकृत रजेवर जाणे इत्यादी बाबी कर्तव्यात कसूर केल्याचे ठरतात.

ड) पर्यवेक्षणात्त्मक स्वरूपाची कामे करणा–या अधिका–यांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेले सर्व कर्मचारी सचोटीने काम करतील व कर्तव्य परायण राहतील यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

ड) कार्यालयीन कर्तव्याचे पालन करताना शासकीय कर्मचारी त्याच्या सद्सदविवेक बुद्धीला न पटणा–या गोष्टी करणार नाही.

इ) ठरवून दिल्येल्या वेळेत सोपविलेले काम करण्यास कसूर करणारा अधिकारी अथवा कर्मचारी , हेतुतः विलंब करणारा व जनतेला त्रास देणारा अधिकारी अथवा कर्मचारी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस व कठोर शिक्षेस पात्र ठरतो.

ई) आपले कर्तव्य बजावतांना अशिष्ट व सौजन्यहीन कर्तव्य बजावणे व कामात टाळाटाळ करणे ,प्रकरण निकालात काढण्यास विलंब

करणे इत्यादी बाबी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस व कठोर शिक्षेस पात्र ठरतो.

फ) वरिष्ठांवर शारीरिक हल्ला करणे वा अश्लील भाषा वापरून शिवीगाळ करणे ही गंभीर गैरवर्तणूक आहे. अशा कर्मचा-यास बडतर्फ देखील केले जाऊ शकते.

प) लोकप्रशासनातील कोणत्याही अधिकारी अथवा कर्मचा-याने अशोभनीय वर्तन करू नये. म्हणजेच कार्यालयीन आवारात दंगा माजविणे,घोषणा देणे,शिवीगाळ करणे,मद्यपान करणे,अश्लील बोलणे वा वर्तन करणे,महिलांशी असभ्यतेने वागणे,वरिष्ठांचा अवमान होईल असे शब्द उच्चारणे, चारित्र्य हनन करणे व खोट्या तक्रारी करणे इत्यादी बाबी अशोभनीय कृतीत येतात.

ट) नोकरीसाठी अर्ज करताना किंवा नोकरीत रुजू होताना खोटे प्रतिज्ञा पत्र देणे इत्यादी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस व शिक्षेस पात्र ठरतात.

ठ) लोकसेवकाला वर्तमानपत्रात भाष्य अथवा निवेदन करावयाचे असेल तर वरिष्ठाची मान्यता घ्यावी लागते.

## २) खासदार/आमदार व इतर लोकप्रतिनिधी सन्मानविषयीचा शासन निर्णय

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दि. २६-१२-१९९९ च्या परिपत्रकाद्वारे लोकसेवकांना असे निर्देश दिले आहेत की, खासदार /आमदार व इतर लोकप्रतिनिधी जेंव्हा जेंव्हा शासकीय कार्यालयात कामानिमित्य भेट देतील त्यावेळी त्यांना आदराची व सौजन्याची वागणूक द्यावी .त्यांना रांगेमध्ये उभे राहण्यास सांगू नये.शासकीय कार्यालयात खासदार व आमदार भेटावयास येते वेळी भेट संपवून परत जाते वेळी अधिका-यांनी त्यांना उत्थापन देऊन अभिवादन करावे.तसेच खासदार व आमदार यांचा दूरध्वनी संदेशाची दखल घेणे आवश्यक आहे. अधिका-यांच्या पश्चात असा दूरध्वनी आला तर असा संदेश समजल्यावर त्यांना दूरध्वनी करावा.

## ३) राजकीय कार्यास प्रतिबंध :-

*कोणत्याही लोकसेवकास कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य होता येत नाही.

* राजकारणात भाग घेण-या संस्थेचा अथवा संघटनेचा सदस्य होता येत नाही.

*कोणत्याही राजकीय पक्षाच्या प्रचारात भाग घेता येत नाही.केवळ मतदान करता येते.

*कोणत्याही राजकीय पक्षाचे चिन्ह अंगावर,वाहनावर अथवा घरावर लावता येत नाही.

* ज्या संघटनेवर बंदी आहे त्या संघटनेशी सबंध ठेवता येत नाही.

* राष्ट्रविघातक व जातीय संघटनेशी संबध ठेवता येत नाही.

४) लोकसेवकास वा त्याच्या कुटुंबीयास किंवा त्यांच्यावतीने काम करणा-या व्यक्तीस देणगी अथवा बक्षीस स्वीकारण्यास परवानगी नाही. (No servant shall accept or permit any member of his family or any person acting on his behalf to accept any gift.)

## २.४ सारांश

कोणत्याही देशातील समाज व्यवस्थेत लोकसेवकांची म्हणजेच प्रशासकीय अधिका-याची भूमिका ही अत्यंत महत्वपूर्ण असते. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वर्तनाचे अनुकरण कनिष्ठ कर्मचारी करीत असतात. त्यामुळे वरिष्ठांनी आदर्श व प्रामाणिक आचरण करून सेवा नियमावलीचे पालन केली पाहिजे.

प्रशासन व्यवस्था अधिकाधिक पारदर्शक, गतिशील ,स्वच्छ व लोकप्रिय बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नागरी सेवा वर्तणूक अधिनियमहा ख-या अर्थाने अमलात आणल्यास देशातील समग्र प्रशासन व्यवस्था कार्यक्षम व गतिशील बनेल. लोकसेवकांनी आपल्या कर्तव्याचे पालन प्रामाणिकपणे केल्यास एक विकसित तथा महासत्ताक राष्ट्र म्हणून भारत देश उदयास येण्यास वेळ लागणार नाही.

या संदर्भात उर्दू भाषेतील एक लेखक असे म्हणतात की,

**इलमदां समजते है तकरीरोन्से बदलता है जमाना।**

**सियासतदां कहते है नारोन्से बदलता है जमाना।**

**हकीमोने फर्माया हुक्मनामोन्से बदलता है जमाना।**

**कातीबोने लिखा है कायदोन्से बदलता है जमाना।**

**पर मिजाजेंहा बदलणेको यह काफी नही होता।**

**नसीहत देनेवाला खुद बदला तो बदलता है जमाना।**

**शिक्षण तज्ञ** म्हणतात की, शिक्षणप्रणाली बदलली की जग(जमाना) बदलते.

**राज्यकर्ते** म्हणतात की, घोषणा (नारे) दिल्याने जग (जमाना) बदलते.

**अधिकारी वर्ग** म्हणतात की, प्रभावी आदेश दिल्याने जग (जमाना) बदलते.

**कायदेपंडित** म्हणतात की, नियम कायदे तयार केल्याने जग (जमाना) बदलते. लेखक म्हणतात की, जनतेचा स्वभाव बदलण्यासाठी हे पुरेसे नाही. उपदेश करणारा स्वतः बदलला की जग (जमाना) बदलतो. त्यासाठी सकारात्मक दृष्टीने विचार करून विविध कामे करण्याची. प्रशासन व्यवस्थेतील प्रत्येकाने आपल्या कर्तव्याचे पालन प्रामाणिकपणे (इमानदारीने) केल्यास समग्र प्रशासन यंत्रणा कार्यक्षम व गतिशील बनेल व जग सुधारण्यास वेळ लागणार नाही.

## २.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

* वर्तणूक :- मनुष्याचे वर्तन किंवा मानवी आचरण होय.

* **अशोभनीय वर्तन :-** कार्यालयीन आवारात दंगा माजविणे,घोषणा देणे,शिवीगाळ करणे,मद्यपान करणे,अश्लील बोलणे,असभ्यतेने वागणे, वरिष्ठांचा अवमान होईल असे शब्द उच्चारणे चारित्र्य हनन करणे इत्यादी स्वरूपाचे वर्तन म्हणजे अशोभनीय वर्तन होय.

*** आचरण नियमावली :-** लोकसेवकांचे वर्तन कसे असावे यासंदर्भात तयार केले नियमावली.

*** खासदार :-** भारतीय संसदेचे सदस्य (लोकसभा अथवा राज्यसभा सदस्य)

*** आमदार :-** विधी मंडळाचे सदस्य (विधानसभा अथवा विधान परिषद सदस्य)

## २.६ स्वंय अध्यायानासाठीचे प्रश्न

## रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

**१)** खासदार/आमदार व इतर लोकप्रतिनिधी यांच्या प्रशासकीय कार्यालयातील सन्मानविषयीचा महाराष्ट्र शासनाने इ.स. .............मध्ये परिपत्रक निर्गमित केले आहे.

अ) १९९९ ब) १९८८ क) १९८५ ड ) १९९०

**२) .............**यांना कोणत्याही राजकीय पक्षाचे चिन्ह अंगावर,वाहनावर अथवा घरावर लावता येत नाही.

अ) कार्येकर्ते ब) उमेदवार क) लोकसेवक ड ) यापैकी नाही

**३ )** केंद्रीय सनदी सेवा आचरण नियमावली ........ नुसार सनदी सेवकांवर आचरण करण्याची बंधने लावण्यात आली आहेत.

अ) १९९९ ब) १९६४ क) १९६७ ड ) १९९०

**४)** इ.स. ............. मध्ये थोमस जी.स्टेपस या लेखकाने अमेरिकन लोकसेवकासंदर्भात एक नीतीनियमावली तयार केली होती.

अ) १९५६ ब) १९८८ क) १९८५ ड ) १९९०

**५ )** लोकसेवक किंवा सनदी सेवक हा प्रशासन व्यवस्थेचा .......... मानला जातो.

अ) मालक ब) आत्मा क) समीक्षक ड) यापैकी नाही

## ३.७ स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**१) अ  २ ) क  ३ ) ब  ४ ) अ  ५ ) ब**

## २.८ अधिक वाचनासाठी उपयुक्त पुस्तके


१) पाटील व्ही.बी. :- समग्र लोकप्रशासन, के सागर प्रकाशन पुणे २०१२

२) बंग के.आर: प्रशासकीय सिद्धांत,विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद २००४

३)प्रतियोगिता दर्पण :- लोकप्रशासन , प्रतियोगिता दर्पण प्रकाशन आग्रा २००७
४) फाडीया बी.एल. उच्चतर लोकप्रशासन , साहित्य भवन पब्लिकेशन आग्रा २००६

५). www.cgat.govin.

६) सोनवणे जगताप :- अधिकारी मार्गदर्शक, सोनादिपा पब्लिशर्स धुळे ,सप्टेंबर २००४

७) सोनवणे जगताप :- कर्मचारी मार्गदर्शक, सोनादिपा पब्लिशर्स धुळे ,सप्टेंबर २००७


# घटक ३.

# प्रशासकीय न्यायाधीकरण

## अनुक्रमणिका

**३.१ उदिष्ट्ये**

**३.२ प्रास्ताविक**

**३.३ विषय विवेचन**

३. ३.१ प्रशासकीय न्यायाधीकरणाचा अर्थ व सकंल्पना

३.३.२. प्रशासकीय न्यायाधीकरणाची व्याख्या

३.३.३. प्रशासकीय न्यायाधीकरणासंदर्भात संविधानातील तरतूद

३.३.४. C.A.T. (केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरण)

३.३.५ प्रशासकीय न्यायाधीकरणाची कार्ये

३.३.६ प्रशासकीय न्यायाधीकरणाचे गुण

३.३.७ प्रशासकीय न्यायाधीकरणाचे दोष

**३.४. सारांश**

**३.५. पारिभाषिक शब्द व शब्दार्थ**

**३.६. स्वंय अध्ययनासाठीचे प्रश्न**

**३.७. स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**३.८ अधिक वाचनासाठी उपयुक्त पुस्तके**

## ३.१ उद्दिष्ट्ये

**प्रशासकीय न्यायाधीकरण** या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणाला

* प्रशासकीय न्यायाधीकरणाचा अर्थ कळेल.
* प्रशासकीय न्यायाधीकरणाचे स्वरूप समजेल.
* प्रशासकीय न्यायाधीकरणाची आवश्यकता लक्षात येईल.
* प्रशासकीय न्यायाधीकरणाची कार्ये समजतील.
* प्रशासकीय न्यायाधीकरणाचे गुण–दोष समजून घेता येईल.

### ३.२ प्रास्ताविक

आधुनिक काळात भारतासह जगातील बहुतांश राष्ट्रांनी लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा स्वीकार केला आहे. त्यामुळे शासनाच्या पर्यायाने प्रशासनाच्या अधिकार व कार्यात प्रचंड वाढ झाली आहे . साहजिकच लोककल्याणाची विविध कामे पार

पाडण्यासाठी लोकसेवकांना महत्वाचे अधिकार प्रदान करणे आवश्यक बनले. शासकीय ध्येय धोरणाचे यशापयश ब-याच प्रमाणात लोकप्रशासनातील लोकसेवकांच्या भूमिकेवर अवलंबून असते. शासनाने आखलेल्या ध्येय धोरणाची अमलबजावणी करणा-या प्रशासकीय व्यवस्थेलाच लोकप्रशासन असे म्हणतात. लोकसेवकांना मिळालेल्या अधिकाराचा दुरुपयोग केला जाऊ नये, म्हणून त्यांच्यावर अंकुश असणे अत्यावश्यक व अनिवार्य आहे. प्रामुख्याने लोकसेवकांच्या कार्यावर देखरेख, मार्गदर्शन व नियंत्रण ठेवण्यासाठी कायदे मंडळ ,कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ महत्वपूर्ण भूमिका पार पाडत असते.

भारतीय शासन व प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करतांना असे दिसून येते की,आधुनिक काळात कार्यकारी मंडळ व लोकसेवकाच्या कार्यक्षमतेवरच समाजाचा पर्यायाने देशाचा सर्वांगीण विकास अवलबून असलेला दिसून येतो. लोकसेवा अथवा प्रशासकीय यंत्रणादेखील कार्यकारी मंडळाचा एक अविभाज्य अंग मानले जाते.लोकसेवक विविध कार्ये करतांना सेवाशर्ती,बढती,बदली सेवाजेष्ठ्ता, पदोन्नती, निवास्थान वाटप ,पेन्शन, स्वेच्छा सेवानिवृती इत्यादी सेवासंदर्भातील कोणताही वाद उद्भवल्यास तो निकालात काढण्याचे कार्य करण्यासाठी प्रशासकीय न्यायाधीकरणाची निर्मिती करण्यात आली आहे.

## ३.३ विषय विवेचन

### ३. ३.१ प्रशासकीय न्यायाधीकरणाचा अर्थ व सकंल्पना :-

शासन संस्थेतील कायदे मंडळ कायदे तयार करण्याचे काम करीत असते तर न्यायमंडळ न्यायदानाचे कार्ये करीत असते.कार्यकारी मंडळ देशातील जनतेला अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी लोककल्याणकारी धोरण,कार्यक्रम.मोहीम व विविध योजना आखत असते तर त्याची अमलबजावणी प्रशासनामार्फत (लोकसेवेमार्फत) केली जाते.अलीकडच्या काळात सर्वसामान्य नागरिक आणि लोकसेवक यांच्यात जवळचा सबंध निर्माण झाला आहे.

अनेकदा या सबंधात कधीकधी तणाव किंवा वादविवाददेखील उद्भवत असतात. तर काही प्रसंगी लोकसेवकच आपापसात भांडत असतात, अशावेळी सामान्य तालुका,जिल्हा अथवा उच्च न्यायालयात वाद नेणे अपेक्षीत नसते. आशावेळी केवळ प्रशासनाशी सबंधित वादविवाद सोडविण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी, हा विचार समोर आला व यातूनच प्रशासकीय न्यायाधीकरणाची स्थापना करण्यात आली.

लोकप्रशासन व्यवस्थेत अधिकारी व कर्मचा-यांच्या सेवाशर्ती संदर्भात जे वादविवाद उत्पन्न होत असतात, त्यासंदर्भातील तक्रारी निवारण करण्यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा आवश्यक होती. त्यासाठी भारतीय संसदेने इ.स. १९८५ मध्ये एक स्वतंत्र अधिनियम संमत करून केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण CENTRAL ADMINISTRETIVE TRIBUNAL स्थापन केले आहे. प्रशासकीय सेवेसंदर्भातील तंटे वा तक्रारी सोडविण्यासाठी एक स्वतंत्र न्यायदानाचे कार्य करणारी यंत्रणा म्हणून प्रशासकीय न्यायाधिकरण कार्य करीत असते.

**३.३.२.प्रशासकीय न्यायाधीकरणाची व्याख्या :-**

**I) डॉ.एल.डी.व्हाईट यांच्यामते**,"प्रशासकीय न्यायाधिकरण म्हणजे खाजगी व्यक्तीशी सबंधित वादांची कायदा व वस्तुस्थिती यांच्या आधारे प्रशासकीय अभिकरणामार्फत चौकशी करणे आणि ते सोडविणे होय."

२) डीमॉक व डीमॉक यांच्यामते,"ज्या प्रक्रियेद्वारे प्रशासकीय आभिकरणे त्यांच्या कार्यात कायदेशीर हक्काबाबत उद्भवणा-या प्रश्नाची सोडवणूक करतात,त्याप्रक्रियेला न्यायालयीन निवाडा असे म्हणतात."

३) ब्लाचली आणि ओटमन यांच्यामते," प्रशासकीय न्यायाधिकरण म्हणजे सामान्य न्यायालयाच्या पद्धतीच्या बाहेरील अशी व्यवस्था

की,ज्या लोकप्रशासनाच्या कृतीवर औपचारिक खटल्याच्या स्वरूपात आक्रमण झाल्यास कायद्याचा योग्य अर्थ लावतात आणि तो निर्णय लागू करतात."

सारांश रूपाने सांगावयाचे झाल्यास नागरिक आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यात उद्भवणारे व लोकसेवकांच्या सेवाशर्ती संदर्भात उद्भवणारे वादविवाद सोडविणारी न्यायव्यवस्था म्हणजे प्रशासकीय न्यायाधिकरण होय.

## ३.३.३ भारतीय संविधानात प्रशासकीय न्यायाधीकरणाची तरतूद :-

भारताच्या संविधानातील **कलम नं. ३२३** मध्ये अशी तरतूद आहे की,संघराज्याच्या अथवा भारताच्या राज्यक्षेत्रातील किंवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील कोणत्याही राज्याच्या किंवा कोणत्याही स्थानिक अथवा अन्य प्राधिकरणाच्या अथवा शासनाच्या मालकीच्या किंवा त्यांनी नियंत्रित केलेल्या कोणत्याही निगमच्या कारभारासबंधी लोकसेवकाच्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीची भरती व सेवाशर्ती याबाबतचे तंटे किंवा तक्रारी यांची न्याय चौकशी वा न्यायनिर्णय प्रशासकीय न्यायाधीकरणामार्फत व्हावा, यासाठी संसदेला कायद्याद्वारे उपबंध करता येईल.

या कलमामध्ये अशी तरतूद आहे की, संघराज्याकरिता एक प्रशासकीय न्यायाधिकरण आणि प्रत्येक घटक राज्याकरिता अथवा दोन किंवा दोनपेक्षा अधिक घटक राज्याकरिता एक स्वतंत्र प्रशासकीय न्यायाधिकरण स्थापन करता येईल.तसेच त्यांची कार्यपद्धती निश्चित करता येईल.

सारांश प्रशासकीय कामात गती यावी व प्रशासनाची कार्यक्षमता वाढावी यासाठी प्रशासकीय न्यायाधिकरणे स्थापन करण्याचा अधिकार संविधानाने भारतीय संसदेला दिला आहे.

## ३.३.४. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरण ( C.A.T. )

भारताच्या संसदेने जानेवारी १९८५ मध्ये प्रशासकीय न्यायाधीकरण अधिनियम संमत केला.या

अधिनियमानुसारच केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण (CENTRAL ADMINISTRETIVE TRIBUNHAL) स्थापन करण्यात आले. लोकप्रशसनातील अधिकारी कर्मचारी वर्गाच्या नियुक्तीसंदर्भात व सेवाशर्तीसंदर्भात वाद निर्माण झाल्यास त्यासंदर्भात चौकशी करण्यासाठी व वाद सोडविण्यासाठी प्रशासकीय न्यायाधीकरण महत्वाची भूमिका पार पडत असते.प्रशासकीय न्यायाधीकरणाचे कार्यक्षेत्र वाढविण्यात आले असून त्यात शासकीय, निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समिती , नगरपरिषद ,महानगर पालिका ,सार्वजनिक महामंडळ इत्यादीचा समावेश करण्यात आला आहे.प्रस्तुत प्रशासकीय न्यायाधीकरणासंदर्भातील अधिनियम जम्मू काश्मीर या राज्याशिवाय भारतातील सर्व घटक राज्ये व केंद्रशासित प्रदेशाला लागू आहे.

## केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणाची रचना :-

केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकणात न्यायदानाचे कार्य करणा-या न्यायाधीशाच्या मंडळाला न्यायपीठ (Bench) असे म्हणतात या न्यायपीठात एक अध्यक्ष व केंद्र शासन ठरवतील इतके सदस्य असतात. सदस्यामध्ये दोन प्रकारचे सदस्य असतात ते म्हणजे न्यायिक सदस्य (Judicial Member ) व प्रशासकीय सदस्य (Administrative Member) असतात.

**I ) न्यायिक सदस्य (Judicial Member :-** न्यायिक सदस्य पदासाठी किमान पात्रता म्हणजे ती व्यक्ती उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम करीत असावी अथवा केल्याचा अनुभव असावा किंवा भारतीय विधी सेवेतील वर्ग एक दर्जाच्या पदावर ३ वर्ष काम केल्याचा अनुभव असावा लागतो.

**II) प्रशासकीय सदस्य (Administrative Member) :-** प्रशासकीय सदस्य पदासाठी किमान पात्रता म्हणजे तो व्यक्ती केंद्र अथवा राज्याच्या प्रशासनात किमान दोन वर्ष अतिरिक्त सचिव पदावर काम केलेले असावे.किंवा तो व्यक्ती केंद्र अथवा राज्य प्रशासनात तीन वर्ष सहसचिव पदावर काम केल्याचा अनुभव

असावा.या तरतूदीच्या आधीन राहून न्यायिक सदस्य (Judicial Member ) व प्रशासकीय सदस्य (Administrative Member)यांची नियुक्ती राष्ट्रपती करीत असतात.

सध्या केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणात एक अध्यक्ष व ६५ सदस्य आहेत. अध्यक्ष पदावर **न्या. प्रमोद कोहली** कार्यरत आहेत तर त्यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण १७ न्यायपीठ Bench न्यायदानाचे कार्य करीत आहेत. या १७ न्यायपीठातील सदस्यांची संख्या पुढील प्रमाणे आहे.

| **अ.क.** | **न्यायपीठाचे नाव** | **सदस्यांची संख्या** |
|---|---|---|
| १ | मुख्य न्यायपीठ | **११** |
| २ | अहमदाबाद न्यायपीठ | **०२** |
| ३ | अलाहाबाद न्यायपीठ | **०८** |
| ४ | बंगळूरू न्यायपीठ | **०४** |
| ५ | चेन्नई न्यायपीठ | **०४** |
| ६ | चंडीगड न्यायपीठ | **०४** |
| ७ | कोटक न्यायपीठ | **02** |
| ८ | इरनाकुलाम न्यायपीठ | **०४** |
| ९ | गुवाहटी न्यायपीठ | **०२** |
| १० | हैद्राबाद न्यायपीठ | **०४** |
| ११ | जबलपूर न्यायपीठ | **०२** |

| | | |
|---|---|---|
| १२ | जयपूर न्यायपीठ | **०२** |
| १३ | जोधपुर न्यायपीठ | **०२** |
| १४ | कोलकत्ता न्यायपीठ | **०२** |
| १५ | लखनौ न्यायपीठ | **०२** |
| १६ | मुंबई न्यायपीठ | **०४** |
| १७ | पटना न्यायपीठ | **०४** |
| | **एकूण सदस्य** | **६५** |

## ३.३.५प्रशासकीय न्यायाधीकरणाची कार्ये :-

प्रशासकीय सेवेसंदर्भात निर्माण झालेले तंटे अथवा वादविवाद सोडविण्याचे मुख्य कार्य प्रशासकीय न्यायाधीकरणास करावे लागते.या न्यायाधीकरणाचे अधिकार, कार्ये, कार्यक्षेत्र इत्यादी बाबी केंद्र शासन निश्चित करीत असते.त्यात खालील बाबींचा समावेश होतो.

१. लोकप्रशासनातील सेवाशर्ती संदर्भात एखाद्या लोकसेवकावर अन्याय झाल्यास अन्यायाविरुद्ध तो व्यक्ती प्रशासकीय न्यायाधीकरणात न्याय प्राप्त करण्यासाठी दावा दाखल करू शकतो.

२. एखादा लोकसेवक सेवानिवृत झाल्यास त्याच्या निवृतीवेतनासंदर्भात अन्याय झाल्यास त्याविरुध्द तो न्यायाधीकरणाकडे दाद मागू शकतो.

३. शिस्त अथवा शिस्तभंगाच्या कार्यवाही संदर्भात काही आक्षेप असल्यास प्रशासकीय न्यायाधीकरणाकडे दाद मागता येते.

४. लोकसेवकाला मिळणारे भत्ते,सेवाजेष्ठ्ता,पदोन्नती,पदावनती,बदली निवास्थान वाटप ,पेन्शन, स्वेच्छा सेवानिवृती इत्यादी संदर्भात कोणताही वाद उद्भवल्यास त्याची सविस्तर चौकशी करून न्यायदान करावे लागते.

५.नैसर्गिक न्याय तत्वाचा भंग झाला असेल तर त्यासंदर्भात अन्यायग्रस्त व्यक्तीला न्याय मिळवून देणे.

## ३.३.६.प्रशासकीय न्यायाधीकरणाचे गुण :-

अलीकडच्या काळात तालुकापातळीवरील न्यायालयापासून ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत न्याय प्राप्तीसाठी प्रचंड विलंब लागत आहे. त्याचबरोबर न्याय प्राप्तीसाठी आर्थिक,शारीरिक व मानसिक त्रासदेखील सहन करावा लागत आहे. त्यामुळे अन्याय झालेला सामान्य नागरिक अथवा अधिकारी –कर्मचारी वर्ग सामान्य न्यायालयाकडे धाव न घेता प्रशासकीय न्यायाधीकरणाकडे धाव घेत आहेत. त्यामुळे प्रशासकीय न्यायाधीकरणाचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. प्रामुख्याने प्रशासकीय न्यायाधीकरणाचे खालील गुण पहावयास मिळतात.

### ३.३.६.१. त्वरित न्याय प्राप्त होतो. :-

भारतीय न्यायपालिकेतील सर्वोच्च न्यायालयापासून ते तालुका पातळीवरील न्यायालयात न्यायदानाचे कार्य निःपक्षपातीपणे व निर्भीडपणे केले जाते परंतु या न्यायपालिकेतील कामकाज पद्धती प्रचंड विलंब लागणारी व गुंतागुंतीची दिसून येते. अनेकदा अन्यायग्रस्त व्यक्तीला न्याय पदरात पडून घेण्यासाठी अनेक वर्ष वाट पहावी लागते. प्रशासकीय न्यायाधीकरणात मात्र तुलनेने लवकर न्याय प्राप्त होत असतो.त्यासाठी प्रदीर्घ काळ वाट पहावी लागत नाही. सामान्य नागरिकाला त्वरित न्याय मिळावा, असे मनोमन वाटत असते. ही सामान्य नागरिकांची अपेक्षा प्रशासकीय न्यायाधिकरनाद्वारेच पूर्ण होऊ शकते.

### ३.३.६.२.न्यायपालिकेवर कामाचा ताण कमी होतो:-

सर्वोच्च न्यायालयापासून ते तालुका पातळीवरील न्यायालयात असंख्य खटले अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले दिसून येतात. प्रशासकीय कार्यालयातील साधारण स्वरूपाचे वादविवाद जर सामान्य न्यायालयात दाखल होऊ लागले तर

न्यायपालिकेवर कामाचा प्रचंड ताण येऊ शकतो. प्रशासकीय न्यायाधीकरणामुळे पारंपारिक न्यायपालिकेवरील कामाचा ताण कमी होण्यास मदत मिळते.

**३.३.६.३.न्यायदानाची प्रक्रिया अधिक चांगली बनते :-**

सामान्य न्यायालयातील न्यायाधीश कायदाशास्त्रात पारंगत असतात पण प्रशासनातील गुंतागुंत किंवा तांत्रिक बाबीसंदर्भात त्याना पुरेसा अनुभव अथवा ज्ञान नसते. परिणामी न्यायदानाचे कार्य करताना त्यांना विलंब लागतो. प्रशासकीय न्यायाधीकरणात न्यायदान करणारे न्यायाधीश लोकप्रशासनातील तज्ञ व अनुभवी असतात.त्यामुळे प्रशासनातील गुंतागुंत किंवा तांत्रिक बाबीसंदर्भात त्याना पुरेसा अनुभव व ज्ञान असतो.साहजिकच प्रशासकीय न्यायाधीकरणात न्यायदानाचे कार्य अधिक जलद गतीने व चांगल्या रीतीने पूर्ण होऊ शकते.

**३.३.६.४.न्यायदानाची प्रकिया सुलभ असते :-**

प्रशासकीय न्यायाधीकारणात न्यायदानाची कार्यप्रणाली किचकट अथवा गुंतागुंतीची नसते. विशेष महत्वाची बाब म्हणजे या न्यायाधीकरणात खर्च देखील कमी येत असतो. न्यायालयातील कार्यप्रणाली देखील परिवर्तनशील व लवचिक स्वरुपाची असते.

## ३.३.७. प्रशासकीय न्यायाधीकरणाचे दोष

सामान्य न्यायालयापेक्षा प्रशासकीय न्यायाधीकरणाची कार्यप्रणाली लवचिक स्वरूपाची ,कमी खर्चिक व जलद गतीची असली तरी ही न्यायाधिकरणे दोषमुक्त नाहीत.प्रामुख्याने खालील दोष या न्यायाधीकरणात दिसून येतात.

**३.३.७.१. नैसर्गिक न्याय तत्वाला सोडून :-**

प्रशासकीय न्यायाधीकरणाची एक मर्यादा म्हणजे या न्यायाधीकरणात अमलबजावणीचे कार्य करणारा अधिकारी वर्गच न्यायदानाचे कार्य करीत असतो.सामान्य न्यायालयातील न्यायाधीश केवळ न्यायदानाचे कार्य करीत असतात.ते पूर्णतः नि;पक्षपातीपणे न्यायदान करीत असतात.

### ३.३.७.२.न्यायदानाचा अनुभव नसतो.:-

प्रशासकीय न्यायाधीकरणात न्यायदानाचे कार्य करणा-या लोकसेवकांना प्रशासकीय कामाचा अनुभव असतो, त्यांना न्यायदान कसे करावे? याबाबतीत अनुभव नसतो.तसेच न्यायालयीन कार्यपद्धती संदर्भात ते अनुभवी नसतात. त्यामुळे त्यांनी दिलेला निकाल किंवा निर्णय नीःपक्ष व सुयोग्य स्वरूपाचा असतोच, असे सांगता येत नाही.

### ३.३.७.३.सामान्य न्यायालयाकडे अपील करणे:-

देशपातळीवर केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्णयाच्या विरुद्ध सामान्य न्यायालयाकडे अपील केले जाते. या न्यायाधीकरणात जलद निर्णय दिला जातो. याउलट सामान्य न्यायालयात अतिशय विचारपूर्वक व सखोल अभ्यास करून निर्णय दिला जातो,त्यामुळे थोडा वेळ लागत असलातरी जनतेचा विश्वास देखील सामान्य न्यायालयावर अधिक असलेला दिसून येतो.

### ३.३.७.४ निर्णयाच्या बाबतीत एकवाक्यता नाही.:-

प्रशासकीय न्यायदानाच्या कार्यपद्धतीत एकवाक्यता दिसून येत नाही. अनेकदा असेही दिसून आले आहे की, वेगवेगळ्या निर्णयात एकवाक्यता दिसून येत नाही.

## ३.४ सारांश

पारंपारिक न्यायालयातील वाढती खटल्यांची संख्या विचारात घेतल्यास असे लक्षात येते की, प्रशासनाशी संबंधी असलेले वादविवाद सोडविण्यासाठी जास्तीत जास्त प्रशासकीय न्यायाधिकरणे स्थापन करणे काळाची गरज बनली आहे. सामान्य न्यायालयात अन्यायग्रस्त व्यक्तीला न्याय प्राप्त करून घेण्यासाठी प्रदीर्घ काळ वर्ष वाट पहावी लागते. परिणामी विलंबाने न्याय प्राप्त करून घेण्यापेक्षा अन्याय सहन केलेला बरा,अशी काही लोकांची मानसिकता बनत आहे.

आधुनिक प्रशासन व्यवस्थेचा एक अविभाज्य भाग म्हणून प्रशासकीय न्यायाधीकरणाकडे पाहिले जाते.भारतात रेल्वे

विभागाचे,आयकर विभागाचे स्वतंत्र न्यायाधिकरण असलेले दिसून येते.याशिवाय लेबर कोर्ट, औद्योगिक न्यायाधिकरण आपल्या खात्याशी सबंधित वादविवाद सोडविण्याचे कार्ये करीत आहेत. याशिवाय वेगवेगळ्या घटक राज्यात त्या त्या राज्याच्या नावाने प्रशासकीय न्यायाधिकरणे कार्ये करीत असल्याचे दिसून येते.

## ३.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

* **न्यायपीठ :-** न्यायाधीशांचे मंडळ

* **संयुक्त प्रशासकीय न्यायाधिकरण :-** दोन किंवा दोनपेक्षा अधिक राज्यासाठी स्थापन केलेले प्रशासकीय न्यायाधिकरण होय**.**

* **प्रशासकीय न्यायाधिकरण:-** लोकप्रशासनाशी सबंधित व लोकसेवकांच्या सेवाशर्ती संदर्भातील वादविवाद सोडविणारे न्याय मंडळ .

* **लेबर कोर्ट :-** कामगार वर्गाशी सबंधित वादविवाद सोडविणारे न्यायालय

## ३.६ स्वंय अध्यायानासाठीचे प्रश्न

## रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा

**१) केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणाची (C.A.T.) स्थापना इ.स..... .......मध्ये करण्यात आली.**

अ) १९९९ ब) १९८८ क) १९८५ ड ) १९९०

**२) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणाची (M.A.T.)स्थापना इ.स..... .......मध्ये करण्यात आली.**

अ) १९९६ ब) १९८८ क) १९८० ड ) १९९०

**३ ) भारतीय संविधानातील कलम नं. ...............प्रशासकीय न्यायाधीकरणाची स्थापना करण्याचा आधीकार संसदेला आहे.**

अ) ३२२ ब) ३२३ क) १८० ड ) १९०

**४) केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणाच्या (C.A.T.) अध्यक्ष,उपाध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती ............मार्फत केली जाते.**

अ) राज्यपाल ब) सरन्यायाधीश क) राष्ट्रपती ड ) केंद्रीय कायदा मंत्री

**५ ) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणाच्या (M.A.T.) अध्यक्ष,उपाध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती ............मार्फत केली जाते.**

अ)राज्यपाल ब)पंतप्रधान
क) मुख्यमंत्री ड ) राज्यपालाच्या सल्यानुसार राष्ट्रपती

**३.७ स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**१) क २ ) अ ३ ) ब ४ ) क ५ ) ड**

## ३.८ अधिक वाचनासाठी उपयुक्त पुस्तके

१) सोनवणे जगताप :- अधिकारी मार्गदर्शक, सोनादिपा पब्लिशर्स धुळे ,सप्टेंबर २००४

२) सोनवणे जगताप :- कर्मचारी मार्गदर्शक, सोनादिपा पब्लिशर्स धुळे ,सप्टेंबर २००७

३) पाटील व्ही.बी. :- समग्र लोकप्रशासन, के सागर प्रकाशन पुणे २०१२

४) बंग के.आर: प्रशासकीय सिद्धांत,विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद २००४

५)प्रतियोगिता दर्पण :- लोकप्रशासन , प्रतियोगिता दर्पण प्रकाशन आग्रा २००७

६) फादिया बी.एल. उच्चतर लोकप्रशासन , साहित्य भवन पब्लिकेशन आग्रा २००६

७. www.cat.govin.